खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

राजगुरुनगर, ता.खेड जि.पुणे ४१०५०५

# वाणिज्य विभाग

## द्वितीय वर्ष वाणिज्य

## सत्र ३

## विषय

## कंपनी कायद्याचे घटक-।

## प्रकरण ३

## कंपनीचे महत्त्वपूर्ण दस्तऐवज

# प्रकरण ३
# कंपनीचे महत्त्वपूर्ण दस्तऐवज

## प्रस्तावना :

कंपनीची नोंदणी होण्याच्या दृष्टीने तिची नोंदणी कंपनी निबंधकाकडे होणे गरजेचे आहे. कंपनीची नोंद झाल्यानंतर तिला कंपनी स्थापनेचे प्रमाणपत्र मिळते की, ज्यामुळे ती कायदेशीर संस्था म्हणून उदयास येते. त्यामुळेच कंपनीची निर्मिती व संस्थापना ही महत्त्वाची ठरते. भांडवल निर्मितीत निधींचे निर्माण हा घटक महत्त्वपूर्ण असतो. याच्यासाठी कंपनीची संस्थापना आणि भांडवल उभारणीसाठी कंपनीला काही महत्त्वपूर्ण दस्तऐवज बाळगणे गरजेचे असते. त्यामध्ये कंपनीचे घटनापत्रक, कंपनीची नियमावली माहितीपत्रक आणि माहितीपत्रकाऐवजी द्यावयाचे निवेदन यांचा समावेश होतो.

कंपनी संस्थापना आणि भांडवल उभारणी संबंधी कागदपत्रे :

१) कंपनीचे घटनापत्रक

२) कंपनीची नियमावली

३) कंपनीचे माहितीपत्रक

४) माहितीपत्रकाऐवजी निवेदन

## <u>कंपनीचे घटनापत्रक (कलम ४)</u>

कोणत्याही प्रकारच्या कंपनीला नोंदणीच्या वेळेस सादर करावे लागणारे अत्यंत आवश्यक कागदपत्र म्हणजे कंपनीचे घटनापत्रक स्पष्ट होय. घटनापत्रकातून कंपनीची मूलभूत घटना स्पष्ट होते तसेच यातून कंपनीची व्याप्ती आणि मर्यादा स्पष्ट केल्या जातात. कंपनीची अपरिवर्तनीय स्वरूपाची सनद म्हणजे कंपनीचे घटनापत्रक असे मानले जाते.केवळ ज्या मूलभूत तत्त्वांवरच कंपनीची स्थापना होऊ शकते ती तत्त्वे असणारी सनद म्हणजे घटनापत्रक होय.घटनापत्रकात कंपनीची उद्दिष्टे व अधिकार निश्चित केलेले असतात आणि कंपनीच्या कामाची व्याप्ती व मर्यादा स्पष्ट केलेली असते. “प्रस्तावित कंपनीच्या दृष्टीने हे अत्यंत महत्त्वाचे कागदपत्र असते.”

**व्याख्या :**

१) भारतीय कंपनी कायदा, १९५६ च्या कलम २ प्रमाणे :

“घटनापत्रक म्हणजे कंपनीने मूलतः तयार केलेली किंवा वेळोवेळी या कायद्यानुसार किंवा पूर्वीच्या कायद्यानुसार बदल केलेली निवेदन पत्रिका होय.’

# कंपनी घटनापत्रकाचे महत्त्व

**१) कंपनीची सनद :**

कंपनीचे घटनापत्रक म्हणजे कंपनीची सनद होय व कंपनीच्या अधिकारावरील मर्यादा त्यातून निश्चित होतात.

**२) सार्वजनिक कागदपत्र :**

घटनापत्रक हे सार्वजनिक कागदपत्र असते आणि कोणालाही त्याची तपासणी करता येते.

**३) कंपनीचा पाया :**

घटनापत्रकातून केवळ कंपनीचे अधिकार निश्चित होत नाहीत तर त्यांच्या मर्यादाही स्पष्ट होतात. खरे म्हणजे, कंपनीची रचना घटनापत्रकाच्या पायावरच आधारलेली असते.

**४) कंपनीच्या कृतींचा आवाका :**

घटनापत्रकात दिलेल्या अधिकारांबाहेर कंपनी कोणतीही कृती करु शकत नाही. कंपनीशी व्यवहार करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला घटनापत्रकातील मजकुराचे पुरेसे ज्ञान आहे असे समजले जाते.

**५) गुंतवणुकीच्या जोखमीबाबतची माहिती :**

घटनापत्रकाद्वारे आपल्या गुंतवणुकीचा वापर कशा प्रकारे होणार आहे आणि त्यामध्ये किती जोखीम आहे हे भागधारकांना कळू शकते.

**६) गुंतवणुकदारांना संरक्षण :**

जे लोक कंपनीशी व्यवहार करतात त्यांना घटनापत्रकातून एक प्रकारचे संरक्षण मिळते.

**७) व्यवहारांना संरक्षण :**

कंपनीशी व्यवहार करताना कंपनीच्या उद्दिष्टांशी त्यांच्यातील कराराचे नाते योग्य रीतीने सुसंगत आहे का हे संबंधित व्यक्तींना कळू शकते.

**८) अपरिवर्तनीयता**

कंपनीची घटना समाविष्ट असल्याने, घटनापत्रक हे अपरिवर्तनीय स्वरुपाचे असते. कलम १६ मध्ये म्हटले आहे की, कायद्यात दिलेल्या मर्यादेपलीकडे आणि दिलेल्या पद्धतीपलीकडे घटनापत्रकात कोणताही बदल करता येत नाही.

## कंपनी घटनापत्रकाचे प्रकार

१) तक्ता 'ब' :

भागाने मर्यादित कंपनीशी संबंधित कंपनीचे घटनापत्रक.

२) तक्त 'क' :

भागभांडवल नसलेल्या आणि हमीने मर्यादित असलेल्या कंपनीचे घटनापत्रक.

३) तक्ता 'ड':

भागभांडवल असलेल्या आणि हमीने मर्यादित असलेल्या कंपनीचे घटनापत्रक.

४) तक्ता 'इ':

अमर्यादित कंपनीशी संबंधित घटनापत्रक.

## कंपनीच्या घटनापत्रातील कलमे

कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम मधील तरतुदी ह्या घटनापत्रामधील समावेशित आशयासंबंधी आहेत. भागाने मर्यादित असणाऱ्या कंपनीच्या घटनापत्रामध्ये पुढील कलमाचा समावेश होतो.

### अ) नाव कलम

नाव कलमामध्ये कंपनीचे नाव सांगितलेले असते. सार्वजनिक कंपनीच्या नावामध्ये शेवटी 'मर्यादित' आणि 'खासगी मर्यादित' हे शब्द असलेच पाहिजेत. कंपनीला कोणते नाव दयायचे याचे निवडीचे स्वातंत्र्य देण्यात आलेले आहे. पण कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम ४ च्या (२) मध्ये नमूद केल्याप्रमाणे कंपनीच्या नावाची नोंदणी पुढील नावानुसार होऊ शकत नाही. जी नावे केंद्र शासनाला अवांछित आहेत त्या नावांनी कंपनी स्थापित होऊ शकत नाही. त्यापैकी कंपनीला पुढील अटी पाळाव्या लागतात.

१) अस्तित्वात असणाऱ्या कंपनीचे नाव घेता येणार नाही.
२) कोणत्याही प्रकारे कालानुरूप असणाऱ्या अधिनियमाचा भंग करणारे नाव.
३) केंद्र शासनाच्या मते किंवा त्यांच्या दृष्टीने अवांछित नाव.
४) सरकारी आश्रय किंवा सहभाग सूचित करणारे नाव धारण करता येत नाही.
५) केवळ ६० दिवसांसाठी आरक्षित नाव.

**ब) नोंदणीकृत कार्यालय कलम**

कंपनीच्या घटनापत्रातील या कलमामध्ये ज्या राज्यात कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय वसलेले आहे, त्याचा नावाचा समावेश होतो. कंपनी कार्यालयाच्या नोंदणीकरण्यासाठी पुढील तरतुदी केलेल्या आहेत.

१) कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय ज्या दिवसापासून कंपनी तिचा व्यवसाय सुरू करेल तेव्हापासून किंवा कंपनीची संस्थापना झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत यापैकी जे लवकर असेल तेव्हा आस्तित्वात आलेच पाहिजेत.

२) कंपनीची निर्मिती झाल्यापासून तीस दिवसांच्या आत नोंदणी कृत कार्यालयाच्या संस्थापनेची सूचना कंपनी निबंधकाकडे पोहोचणे सक्तीचे आहे.

३) कंपनीच्या कार्यालयाची स्थापना कंपनीचा रहिवास निश्चित करतो. कंपनीचा रहिवास निश्चित झाल्यामुळे कंपनीच्या न्यायालयात कामकाजाची निश्चिती होऊन कायदेशीर कृतींबद्दल न्यायालयाला निश्चित स्वरूपाचे ज्ञान होईल.

४) कंपनीची सर्व महत्त्वाची कागदपत्रे जसे की, वार्षिक अहवाल, मिनट्सबुक्स यांसारखे महत्त्वाचे दस्ताऐवज कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात ठेवता येतात. त्याचप्रमाणे सर्व महत्त्वाचे संप्रेषण सूचना, परिपत्रके, न्यायालयीन प्रक्रिया आणि इतर बाबी या कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात ठेवता येतात.

**क) उद्देश कलम**

कंपनी घटनापत्रकातील हे कलम ज्या हेतूचे कंपनीची उभारणी झाली त्या हेतूने स्पष्टीकरण व्हावे म्हणून याचा समावेश केला गेला. घटना पत्रामधील हे सर्वात महत्त्वाचे कलम आहे. याचा मसूदा काळजीपूर्वक तयार केला गेला पाहिजेत. कंपनीचा उद्देश हा निश्चित आणि सुस्प्ष्ट शब्दांत सागितला गेला पाहिजे. अधिनियमाच्या कलम ५ नुसार या उद्देश कलमाचे दोन पोट कलमात विभाजन झालेले आहे.

१) मुख्य उद्देश कलम :

कंपनीची निर्मिती करत असताना ज्या हेतूने प्रेरित होऊन कंपनीची स्थापना झाली तिचा उल्लेख स्पष्ट स्वरूपात होणे गरजेचे आहे.

२) इतर/अन्य उद्देश कलम :

हे कलम अथवा खंड असे सांगते की, वरील खंडामध्ये ज्या उद्देशांचा अथवा उद्दिष्टांचा समावेश केला गेला नाही, त्या सर्वच उद्देशांचा त्यात समावेश होतो.

३) उद्देश कलमाचा हेतू :

i) वित्त विनियोग समजण्यासाठी:

ii) सुरक्षिततेची भावना निर्माण होणे:

III) कंपनी कृतींची निश्चिती:

**ड) दायित्वाचे कलम**

कंपनीच्या घटना पत्रातील या कलमामध्ये कंपनीच्या सदस्यांच्या जबाबदारीचे स्वरूप समावेशित केलेले असते. ज्या कंपनी सदस्यांचे दायित्व मर्यादित स्वरुपाचे आहे, त्या कंपन्यांच्यासाठी हे कलम आवश्यक आहे. या कलमामधून बऱ्याचदा ती कंपनी भागाने मर्यादित आहे की हमीने ही गोष्ट देखील लक्षात घेण्याची शक्यता असते. या अशा परिस्थितीत जबाबदारीच्या कलमामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो.

१) भागाने मर्यादित कंपनी असताना

२) हमीने मर्यादित कंपनी असताना

**इ) भांडवल कलम**

कंपनीच्या घटनापत्रातील या कलमामध्ये ज्या भागभांडवलाच्या आधारे कंपनीची नोंदणी होणार असते, रकमेचा समावेश केलेला असतो. त्याचप्रमाणे या कलमामध्ये कंपनीचे भांडवल ज्या भागांमध्ये विभाजित होणार असते त्या भागांची एकूण संख्या आणि मूल्य देखील नमूद केलेले असते. ज्या भांडवलाच्या सहाय्याने कंपनीचे नोंदणीकरण होणार असते त्या भांडवलाला 'अधिकृत भांडवल' असे म्हणले जाते. या कलमाचा होणारा सर्वांत महत्त्वपूर्ण परिणाम म्हणजे कंपनीच्या घटनापत्राने मान्यता दिल्यापेक्षा जास्त भाग कंपनी अधिकृतरित्या निर्गमित करू शकत नाही.

**फ) संघटना कलम**

कंपनी घटनापत्राच्या शेवटी प्रत्येक कंपनी तिच्या ग्राहकांसाहित संघटनेचे घोषणापत्र जाहिर करते ग्राहक असे घोषित करतात की, आम्ही अनेक व्यक्ती ज्यांची नावे पत्ता आणि व्यवसाय नमूद केलेले आहेत ते कंपनीच्या निर्मिती संबंधी अतिशय उत्सूक असून तिच्या घटनापत्रात नमूद केल्याप्रमाणे भाग स्वीकारण्यास देखील तयार आहोत असे घटना पत्राच्या शेवटी नमूद केलेले असते.

# घटनापत्रकातील बदल/दुरूस्ती

## अ) नाम विधान (कलम २१ ते २४)

भारतीय कंपनी कायद्याच्या कलम २१ ते २४ मध्ये घटनापत्रकातील नाम विधानात कराव्या लागणाऱ्या बदलाविषयक तरतुदी दिलेल्या आहेत. कंपनीच्या नावातील बदल व नावाची दुरुस्ती असे दोन प्रकारचे बदल या विधानात होत असतात.

१) नावातील बदल:

मध्यवर्ती सरकारची पूर्वसंमती घ्यावी लागते व कंपनीने विशेष ठराव संमत करावा लागतो.

२) नावाची दुरुस्ती :

मध्यवर्ती सरकारची पूर्वसंमती घ्यावी लागते व कंपनीने साधा ठराव (साध्या बहुमताने) संमत करावा लागतो. नाम विधानात बदल केल्यानंतर ३० दिवसांच्या आत नोंदणी अधिकाऱ्याला हा बदल कळविला पाहिजे. आवश्यक ती कायदेशीर उपाययोजना न केल्यास संबंधित अधिकाऱ्यास (कंपनी चिटणीसास) गुन्हा चालू असेपर्यंत दररोज १०० रुपये इतका दंड होऊ शकतो.

## ब) स्थल विधान (कलम १७)

१) एका राज्यातून दुसऱ्या राज्यात कंपनीच्या कचेरीचे स्थलांतर करणे :

ठराव संमत केल्यानंतर ९० दिवसांच्या आत न्यायालयाच्या संमती आदेशाच्या प्रती व बदल केलेल्या घटनापत्रकाच्या प्रती व ठरावाच्या प्रती संबंधित दोन्ही राज्यांच्या नोंदणी अधिकाऱ्याकडे पाठवाव्या लागतात.

२) एका शहरातून दुसऱ्या शहरात कंपनीच्या कचेरीचे स्थलांतर करणे :

स्थल विधानात बदल करावा लागत नाही; परंतु या स्थलांतरासाठी कंपनीला विशेष ठराव संमत करावा लागतो व त्याची एक प्रत ३० दिवसांच्या आत नोंदणी अधिकाऱ्याकडे दाखल करावी लागते.

३) एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी कंपनीच्या कचेरीचे स्थलांतर करणे :

स्थल विधानात बदल करावा लागत नाही; परंतु या स्थलांतरासाठी संचालक मंडळाला ठराव संमत करावा लागतो आणि स्थलांतरानंतर ३० दिवसांच्या आत नोंदणी अधिकाऱ्याला त्याबद्दल कळवावे लागते. आवश्यक त्या कायदेशीर बाबी पार न पाडल्यास कंपनीला व संबंधित अधिकाऱ्याला दररोज ५० रुपये इतका दंड होऊ शकतो.

## क) उद्दिष्ट विधान (कलम १७)

कंपनीच्या उद्दिष्ट विधानात फक्त पुढील कारणांसाठीच बदल करता येतो.

१) कंपनीचा व्यवसाय अधिक कार्यक्षमतेने व काटकसरीने चालविणे.

२) कंपनीची मुख्य उद्दिष्टे नवीन व सुधारित मार्गांनी गाठणे.

३) कंपनीच्या कार्याचा विस्तार करणे किंवा कार्याची व्याप्ती बदलणे.

४) कंपनीच्या सध्याच्या व्यवसायाला पूरक असा नवीन व्यवसाय सुरू करणे.

५) कंपनीची काही उद्दिष्टे सीमित (मर्यादित) करणे किंवा काही उद्दिष्टे सोडून देणे.
६) कंपनीच्या व्यवसायाचा काही भाग किंवा संपूर्ण व्यवसाय विकणे.
७) कंपनीने दुसऱ्या कंपनीत सामील होणे.

विशेष ठराव संमत करावा लागतो व न्यायालयाची संमती मिळाल्यानंतर कंपनीला ९० दिवसांच्या आत न्यायालय संमतीपत्रकाच्या प्रती व बदल केलेल्या घटनापत्रकाच्या प्रती नोंदणी अधिकाऱ्याच्या दप्तरी दाखल कराव्या लागतात.

**ड) भांडवल विधान (कलम ९४)**

१) भागभांडवलात वाढ करणे

कंपनीला नियमावलीतील तरतुदीप्रमाणे साधा किंवा विशेष ठराव संमत करावा लागतो. संमत केलेल्या ठरावाची एक प्रत नोंदणी अधिकाऱ्याकडे ३० दिवसांत दाखल करावी लागते. संमत झालेल्या ठरावात भागभांडवल वाढीची संपूर्ण पद्धत नमूद करावी लागते.

२) भागभांडवलात घट करणे

i) भागावर दिलेली रक्कम देण्याबाबतची सभासदांची जबाबदारी कमी किंवा नाहीशी करणे.
ii) कंपनीचे कोणत्याही मालमत्तेने न दर्शविले जाणारे भांडवल हिशेबातून काढून टाकणे.
iii) अनावश्यक वसूल भागभांडवल सभासदांना परत करणे.

३) भागभांडवलाची पुनर्रचना

i) भागांचे एकत्रीकरण करणे ii) भागांचे विभाजन करणे iii) अग्रहक्क भागाचे समहक्क भागात रूपांतर करणे

**इ) जबाबदारी विधान**

आवश्यक ते अधिकार नियमावलीने कंपनीला दिलेले असले पाहिजेत. त्याचप्रमाणे अशा बदलास सभासदांची मान्यता घेणे आवश्यक असते. सभासदांप्रमाणे सर्व संचालकांची किंवा व्यवस्थापकीय संचालकांची जबाबदारी अमर्यादित करावयाची असेल, तर कंपनीला विशेष ठराव संमत करावा लागतो. न्यायालयाच्या संमतीची सभासदाच्या जबाबदारीतील बदलासाठी आवश्यकता नसते. जबाबदारीत बदल केल्यावर संबंधित व्यक्तींना त्याची लेखी सूचना द्यावी लागते; परंतु अशा प्रकारे सभासदांची जबाबदारी अमर्यादित केल्याचे क्वचित दिसते.

**फ) संघटन व सही विधान**

संघटन व सही विधानात बदल संभवत नाही.

# कंपनीची नियमावली

**अर्थ**

कंपनीच्या अंतर्गत प्रशासनासाठी असणारी नियमांची चौकट म्हणजे कंपनीची नियमावली होय. कंपनीची नोंदणी प्रक्रिया चालू असताना निबंधकासमोर सादर करावे लागणे दुसऱ्या क्रमांकाचे व महत्त्वाचे दस्तऐवज म्हणजे कंपनीची नियमावली होय. कंपनीच्या व्यवहारात समन्वय आणि सुसूत्रीकरण स्थापित करण्यासाठी महत्त्वाचे माध्यम म्हणजे कंपनीची नियमावली होय. कंपनीच्या घटनापत्रामध्ये कंपनीच्या पायाभूत वैधानिक अटींचा उल्लेख आलेला असतो, की ज्याच्या आधारे कंपनीची निर्मिती होत असते.

**व्याख्या**

"कंपनीच्या अंतर्गत व्यवस्थापनेसंबंधी केलेले नियम ज्यामध्ये असतील त्यास कंपनीची नियमावली असे म्हणतात."

"कंपनीचा अंतर्गत कारभार व्यवस्थितपणे, सुरळीतपणे, वेगाने व कार्यक्षम रीतीने चालावा याकरिता कंपनीने स्वीकृत केलेल्या किंवा ठरविलेल्या नियमांना नियमावली असे म्हणतात.'

## कंपनी नियमावलीचे प्रकार

१) टेबल 'A':

भागाने मर्यादित भागभांडवलीय सार्वजनिक कंपन्या करीता.

२) टेबल 'C':

भागविरहीत कंपन्या जर पुढील तरतुदींच्या हस्तातरणावरती बंधने न घातल्यास, ५० पेक्षा जास्त सदस्य संख्या.

अ) हमीने मर्यादित कंपनी असताना (कलम २७) :

हमीने मर्यादित कंपनी असताना नोंदणीकरण करताना कंपनीच्या घटनापत्राबरोबरच कंपनीची नियमावली सादर होणे अनिवार्य आहे. या कलमानुसार किती सदस्यांनिशी कंपनीची नोंदणी होत आहे त्यांची सदस्य संख्या उल्लेखणे आवश्यक आहे.

ब) अमर्यादित कंपनी (कलम २९) :

कंपनीच्या घटनापत्राबरोबरच याही कंपन्यांच्या नियमांची नोंद होणे आवश्यक आहे.

३) टेबल 'D' :

हमीने मर्यादित भागभांडवलीय कंपन्यांकरिता.

४) टेबल 'E' :

अमर्यादित कंपन्याकरिता.

भागाने मर्यादित कंपन्यांच्या व्यतिरिक्त कोणतीही कंपनी कंपनीच्या नियमावलीमध्ये कोणत्याही विषयावरती नियमांचा समावेश करून घेऊ शकते.

# कंपनी नियमावलीतील तपशील

कंपनीच्या नियमावलीमध्ये सर्वसाधारणपणे पुढील तरतुदींवरती विचार केलेला दिसतो.

- ✓ टेबल 'अ' मध्ये सांगितलेल्या काही भागावर संपूर्णपणे किंवा अंशतः बहिष्कार.
- ✓ भाग भांडवल
- ✓ विभिन्न वर्गाच्या भागधारकांचे अधिकार
- ✓ भागांचे वाटप
- ✓ भागांवरील मागणी रक्कम
- ✓ भागांचे एकीकरण
- ✓ भाग जप्ती
- ✓ भागांचे हस्तांतरण
- ✓ भाग समर्पण
- ✓ भाग प्रमाणपत्र
- ✓ भाग अधिपत्रांचे निर्गमन
- ✓ भाग भांडवलातील वृद्धी किंवा कमतरता
- ✓ भागांचे ठेवीत रुपांतरण
- ✓ भागांचे विभाजन आणि एकत्रीकरण
- ✓ अधिकारांचे प्रदान
- ✓ सर्वसाधारण सभा,त्यांचे कामकाज आणि मतदान
- ✓ व्यवस्थापकीय श्रेणीतील व्यक्तींची नियुक्ती.
- ✓ कंपनीच्या अंकेक्षकाची नियुक्ती व मानधन उदाहरणार्थ संचालक, त्यांचे मानधन, अधिकार आणि संचालक मंडळाच्या सभांची कार्यपद्धती
- ✓ लाभांश आणि ठेवी
- ✓ कंपनीचे हिशेब व अंकेक्षण
- ✓ प्राथमिक करारांचा स्वीकार आणि मुक्तता
- ✓ नफ्याचे भांडवलीकरण
- ✓ सूचना
- ✓ सर्वसाधारण मुद्रा
- ✓ कंपनीचे समापन

कंपनीच्या नियमावलीमध्ये कंपनीच्या घटनापत्रातील योग्य वाटेल त्या नियमांचे कंपनी नियमन करू शकते.

# नियमावलीत बदल/दुरुस्ती

**अ) बचावाच्या तरतुदी :**

कलम ५ (३) कंपनी कायदा २०१३ प्रमाणे : "नियमावलीत बचावासाठीच्या तरतुदी अशा अर्थाने असाव्यात व नियमावलीतील विशिष्ट प्रकारच्या तरतुदींची दुरूस्ती अशी व्हावी की, खास ठरावाबाबत लागू असलेल्या पेक्षा अटी किंवा पद्धती अधिक निबंधकारक असून त्यांची पूर्तता त्यांना अनुसरून व्हावी.

**ब) कंपनी कायदा १९५६ प्रमाणे नियमावलीत बदल करण्याविषयी निर्बंध**

नियमावलीत बदल करण्यावर काही निर्बंध घातले आहेत. ते पुढील प्रमाणे :

**१) कायदेशीर निर्बंध :**

i) दुरूस्ती खास ठरावानेच झाली पाहिजे (कलम ३१)
ii) बदल कंपनी कायद्यातील तरतुदींशी विसंगत नसावा (कलम ३१)
iii) बदल घटनापत्रकाशी विसंगत नसावा
iv) नियमावली बदलण्यास केंद्र सरकारची परवानगी असावी
v) सभासदांची लेखी संमती आवश्यक (कलम २६८)
vi) न्याय मंडळाची पुष्टी आवश्यक (कलम ४०४)

**२) न्यायालयीन निबंध :**

न्यायालयीन निबंध पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील
i) व्यवसायासाठी बदल बेकायदेशीर नसावे
ii) बदल सद्भावनेने आणि कंपनीच्या लाभासाठी असावा
iii) करार केलेल्या व्यक्तीचा अधिकार बदलाने हिरावून घेता कामा नये
iv) बहुमत असलेल्यांनी अल्पसंख्यांकांची बदलाद्वारे फसवणूक करू नये
v) तिसऱ्या पक्षकाराशी केलेल्या कराराचा भंग होता कामा नये

# कंपनीचे माहितीपत्रक

**अर्थ**

कंपनी नोंदणीचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर सार्वजनिक कंपनीचे संचालक जर कंपनीकरिता आवश्यक भांडवल उभे करण्यात अपयशी ठरले तर अशा परिस्थितीमध्ये कंपनी लोकांना त्यांचे भाग आणि कर्जरोखे खरेदी करण्यासाठी निमंत्रित करते. यासाठी ज्या दस्ताऐवजाचे कंपनी निर्गमन करते त्याला कंपनीचे माहितीपत्रक असे म्हणतात. माहितीपत्रकाचा उद्देश कार्यक्षम गुंतवणूकदारांचे कंपनी मधील हितसंबंध निर्माण करून त्यांना कंपनीचे भाग आणि कर्जरोखे यांत गुंतवणूक करण्यास प्रवृत्त करणे हा असतो

# माहितीपत्रकातील तपशील

**अ) १९५६ अधिनियम (परिशिष्ट-II, विभाग-1) :**

**१) सर्वसाधारण माहिती :**

यामध्ये

i) कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता व नाव

ii) जिथे अर्जाची यादी तयार होऊ शकेल अशा संग्रहण विनिमयाचे नाव

iii) प्रगटीकरणाचे निर्गमन झाल्यानंतर संग्रहीत झालेल्या पूर्वनिधीचे कमीत-कमी प्रमणाचे घोषणापत्रक

iv) वाटप पत्रे, १० आठवड्यांमधील रिफण्ड्स आणि कलम ७३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विहित दराने आकारलेल्या व्याजाचे घोषणापत्रक

v) प्रचालनाचा आरंभाचा आणि अंतिम दिनांक

vi) प्रमुख व्यवस्थापक आणि अंकेक्षकांचा नाव व पत्ता

**२) कंपनीची भांडवल संरचना**

i) प्राधिकृत, निर्गमित खरेदी आणि देय केले गेलेले भांडवल.

ii) वर्तमान प्रचालनाचा आकार, प्रवर्तक आणि इतरांना विभिन्नत्वाने देण्यात आलेले अग्रहक्कांचे वाटप.

**३) वर्तमानकालीन निर्गमनाच्या अटी**

i) देयकाच्या अटी ii) अर्जाची पद्धत iii) अन्य कर लाभ

**४) प्रचालनाचे किंवा निर्गमनाचे विशेष**

i) वस्तुस्थिती ii) प्रकल्प मूल्य iii) वित्ताची साधने (प्रवर्तकांच्या योगदानासहित)

**५) कंपनी व्यवस्थापन आणि प्रकल्प**

i) कंपनीचा इतिहास, उद्दिष्टे आणि वर्तमानकालीन व्यवसाय
ii) प्रकल्पाचे स्थान
iii) उत्पादनाचे स्वरूप, निर्यात संभवनीयता
iv) भागांची माहिती, उच्च आणि निम्न किंमतीचे कर्जरोखे
v) व्यवस्थापनाचे जोखीम घटकांबाबतचे दृष्टिकोन
vi) प्रवर्तक आणि त्यांची पार्श्वभूमी
vii) एखादे सहयोगीत्व
viii) भविष्यकालीन अंदाज
ix) एकाच व्यवस्थापनाखालील कंपनीचे विशेष

**६) माहितीपत्रकामधील समावेशित अहवाल**

i) कंपनीच्या नफ्या-तोटयाशी संबंधित तसेच मत्ता व दायित्वास निगडीत अंकेक्षकाचा अहवाल
ii) गेल्या ५ वर्षांपासून कंपनीने दिलेल्या लाभांशांचा अंकेक्षकाचा अहवाल.
iii) सध्या अस्तित्त्वात असणाऱ्या कोणत्या एखाद्या व्यवसायाचा खरेदीचा कंपनीचा हेतू, अशा व्यवसायाचे मूल्यांकन करणारा सनदी लेखापालाचा अहवाल ; त्या सनदी लेखापालाचे नाव माहिती पत्रकात समाविष्ट असावे.
iv) अन्य एखाद्या कंपनीच्या भागांची खरेदी करण्यासाठी भागभांडवलाचा उपयोग केला गेला असेल तर अशा कंपनीचे मूल्यांकन करणारा सनदी लेखापालाच्या अहवालाचा समावेश माहिती पत्रकात केलेला असावा.
v) कंपनी बद्दल विहित केलेली निश्चित वैशिष्ट्ये एकाच व्यवस्थापनाद्वारे व्यवस्थापित केल्या गेलेल्या अन्य कंपन्यांची यादी की ज्यांनी गेल्या तीन वर्षांमध्ये भांडवलाचे निर्गमन केलेले आहे.
vi) वित्तीय विषयासंबंधी चालू असलेले दावे किंवा परिशिष्ट १३ नुसार कंपनी अथवा तिच्या संचालकाविरुद्ध सुरू असणारी गुन्हेगारीची प्रक्रिया
vii)व्यवस्थापनाचे जोखीम घटकांबाबतचे आकलन.

**ब) १९५६ अधिनियम (परिशिष्ट-II विभाग-II)**

**१) सर्वसाधारण माहिती**

i) निर्गमनाला संचालक, व्यवस्थापक, अंकेक्षक, कायदेतज्ज्ञ यांची संमती.
ii) गेल्या ३ वर्षामध्ये संचालक, अंकेक्षक इत्यादींमध्ये झालेला बदल व त्याची कारणे.
iii) प्रमाणपत्र वाटप आणि निर्गमनाची कार्यपद्धती आणि वेळेचे नियोजन.
iv) कंपनी सेक्रेटरी, कायदे सल्लागार, मुख्य व्यवस्थापक सह व्यवस्थापक, अंकक्षक, बँक व्यवसायी, शेअर दलाल यांची नावे व पत्ता

**२) वित्तीय माहिती**

i) गेल्या ५ वर्षातील कंपनीचा नफा-तोटा, मत्ता दायित्त्व यासंबंधीचा त्याचप्रमाणे गेल्या ५ वर्षात दिले गेलेले लाभांश यांचा अंकेक्षकाद्वारे निर्गमित केला गेलेला अहवाल.

ii) गेल्या ५ वित्तीय वर्षातील कंपनीच्या नफा-तोट्याचा तसेच ज्या मत्ता आणि दायित्वासंबंधी माहिती पत्रकाचे निर्गमन झालेले आहे त्यावरील लेखापालाचा अहवाल.

**३) वैधानिक आणि अन्य माहिती**

- किमान सदस्यत्त्व
- निर्गमनाचा खर्च
- जोखीमांकनाचे कमिशन आणि दलाली.
- मागील प्रचालनाच्या वाटपाची पुनर्निधीची सवलती इत्यादीचे दिनांक.
- रोख रकमेच्या व्यतिरिक्त भागांचे निर्गमन
- कोणत्याही संपत्तीच्या खरेदीची माहिती
- मत्तेचे पूर्नमूल्यांकन
- पर्यवेक्षित केले गेलेले विविध करार

## माहितीपत्रकातील तपशीलाबाबत कंपनी कायद्यातील तरतुदी

**१) संस्थापनेनंतर प्रचालन**

कंपनीची संस्थापना झाल्यानंतर सर्वसाधारणपणे माहिती पत्रकाचे निर्गमन होते तरीही कलम ५५ हे अपेक्षित कंपनीसाठी माहितीपत्रकाचे निर्गमन करण्याची परवानगी देते.

**२) माहितीपुस्तकाचे दिनांकन**

१९५६ च्या कंपनी अधिनियमाच्या कलम ५५ अनुसार कंपनीच्या नावे ज्यावेळेस माहिती पत्रकाचे प्रचालन होते त्यावेळेस ते दिनांकित केले जाणे अपेक्षित आहे. जो दिनांक माहिती पत्रकावरती दिसतो तो माहिती पुस्तकाच्या प्रकाशनाचा दिनांक म्हणून मानण्यात यावा की जेणेकरून कोणताही वादविवाद निर्माण होणार नाही.

**३) माहितीपत्रकाची नोंदणी**

कंपनी अधिनियमाच्या कलम ६० नुसार माहिती पत्रकाची प्रत ही कंपनी निबंधकासमोर सादर होणे किंवा प्रकाशनपूर्व त्याचे सादरीकरण होणे अपेक्षित आहे. जी प्रत्येक व्यक्ती कंपनीचे संचालकपद माहितीपत्रकात दिलेल्या माहितीनुसार सांभाळत आहे अशा प्रत्येक व्यक्तीची त्या प्रतिवरती सही केलेली असणे अपेक्षित आहे. जर माहितीपत्रक हे एकापेक्षा जास्त भाषांमध्ये ते प्रचलित होईल तेवढ्या प्रत्येकाची प्रत निबंधकासमोर सादर होणे अपेक्षित आहे.

**४) ९० दिवसांच्या आत माहितीपत्रकाचे प्रचालन**

कंपनी निबंधकाकडे माहितीपत्रकाचे सादरीकरण झाल्यानंतर नोंदणीकरणानंतर ९० दिवसांच्या आत त्याचे वर्तमानपत्रातील जाहिरातीद्वारे प्रचालन होणे गरजेचे आहे.

**५) तज्ञ हे कंपनी निर्मिती किंवा व्यवस्थापनाशी संबंधित नसावेत**

तज्ञ व्यक्ती ही कोणत्याही प्रकारे कंपनीच्या निर्मितीत, प्रवर्तनात किंवा व्यवस्थापनात सहभागी नसावी.

**६) माहितीपत्रकात सत्य आणि पर्याप्त माहितीचा समावेश असावा**

सेबीने केलेल्या मार्गदर्शनपर सूचनेनुसार प्रत्येक माहिती पत्रकामध्ये दिली जाणारी सर्व माहिती ही खरी आणि पर्याप्त असली पाहिजे. या अशा माहितीमुळे गुंतवणुकदार कंपनीत गुंतवणूक करायची अथवा नाही या प्रकारचा निर्णय घेण्यास समर्थ होतो.

**७) करारात किंवा उद्दिष्टात येणारी विविधता**

२०१३ च्या अधिनियमात नमूद केल्याप्रमाणे ज्यावेळेस निर्गमित केलेल्या माहिती पत्रकामध्ये समावेशित केली गेलेली उद्दिष्टे किंवा कराराच्या अटी यांमध्ये जर संदर्भानुसार बदल करावयाचा असेल किंवा त्यात विविधता आणायची असेल तर त्यासाठी विशेष ठरावाद्वारे मंजुरी आवश्यक केली गेली.

**८) काही निश्चित सदस्यांकडून भाग विक्री देऊ करणे**

२०१३ च्या अधिनियमात समावेशित केलेल्या नवीन कलमानुसार कंपनीचे काही सदस्य संचालक मंडळाशी सल्ला मसलत करून त्यांनी अधिग्रहित केलेल्या भागांचा काही अंश ते लोकांना देऊ शकतात. ज्या कागदपत्रांच्या साहाय्याने लोकांसाठी भाग विक्रीला देऊ केले जातात.

# माहिती पत्रकाऐवजी द्यावयाचे निवेदन

**अ ) अर्थ**

माहितीपत्रकाऐवजी द्यावयाचे निवेदन हे एक अशा प्रकारचे दस्ताऐवज आहे की, ज्यामध्ये माहितीपत्रकाऐवजी हे निवेदन तयार केले जाते आणि निबंधकासमोर सादर केले जाते.

**ब) माहितीपत्रकाऐवजी निवेदनाचे प्रचालन करावयाच्या अटी**

पुढील परिस्थितीमध्ये माहितीपत्रकाऐवजी निवेदनाचे प्रचालन करता येते.

१) ज्यावेळेस सार्वजनिक कंपनीकडे भाग भांडवल आहे पण माहितीपत्रकाचे प्रचालन केलेले नाही.

२) ज्यावेळेस खासगी कंपनीचे रूपांतरण सार्वजनिक कंपनीत केलेले आहे.

३) ज्यावेळेस कंपनीकडे संस्थापनाकरिता आवश्यक भांडवल आहे पण माहितीपत्रकाच्या प्रचालनाची आवश्यकता भासत नाही.

४) ज्यावेळेस सुरूवातीच्या काळात कंपनीला भाग आणि कर्ज रोखे लोकांना देऊ करावयाचे नसतात पण नंतरच्या काळात मात्र त्यांचे निर्गमन करायचे असते.

५) ज्यावेळेस कंपनी त्यांच्या भागांची आणि कर्जरोख्यांची विक्री करते आणि त्या व्यक्ती नंतर त्यांचे निर्गमन स्वरूपात करतात.

**क) माहितीपत्रकाऐवजी द्यावयाच्या निवेदनातील समाविष्ट बाबी**

माहितीपत्रकाऐवजी द्यावयाच्या निवेदनात पुढील बाबी समाविष्ट असतात.

- प्राथमिक खर्चाची रक्कम
- भागभांडवलाची माहिती
- खरेदी केलेल्या मत्तेचा तपशील
- संचालक आणि व्यवस्थापकीय कर्मचारी यांचा तपशील व त्यांचे मानधन
- प्रतिभूती हमीधारकांचे नाव आणि पत्ता
- कंपनीच्या संपत्तीमधील संचालकांचे अधिकारांचे तपशील
- अग्रहक्क भागांवरील प्रतिदेय असणारी भांडवली रक्कम आणि त्यांचा देय दिनांक
- महत्त्वपूर्ण करारांवरील रकमा, त्यांचे वितरण आणि पूर्ततेचा दिनांक
- कंपनीच्या पर्यवेक्षित केल्या गेलेल्या वित्तीय खात्यांची वेळ आणि ठिकाण.

**ड) दंड किंवा शिक्षा :**

जर वर दिलेल्या अटींचे पालन करताना काही त्रुटी आढळून आल्या तर ती कंपनी आणि तिचा प्रत्येक संचालक हा वैयक्तिकरित्या दंडास पात्र ठरतो दंडाची रक्कम रूपये दहा हजारापर्यंत वाढत जाते. वित्तीय स्वरूपातील दंड ज्याची रक्कम ५०,०००/- पर्यंत वाढत जाते किंवा दोन वर्षांपर्यंत तुरुंगवासाच्या शिक्षेस तो पात्र मानला जातो.

# माहिती पत्रकातील चुकीचे विधान व त्याबद्दलचे दायित्व

## अ) अर्थ आणि व्याख्या

१९५६ च्या कंपनी अधिनियमाच्या कलम ६५(१) अनुसार

१) जर माहितीपत्रकात समाविष्ट केलेले विधान हे असत्य असल्याचे आढळल्यास किंवा जर हे विधान लोकांना अयोग्य मार्गदर्शन करणारे दिसून आल्यास त्या विधानाचा ज्या माहिती पुस्तकात समावेश केला आहे ते आणि २) माहितीपत्रकातून वगळलेला कोणताही भाग जर अयोग्य मार्गदर्शन करणारा असला तर ते माहितीपत्रक चुकीचे मार्गदर्शन करणारे आहे मानले जाईल. अशा चुकीच्या विधानाबद्दल पुढील व्यक्तींना जबाबदार मानले जाईल. i) कंपनी ii) प्रवर्तक iii) संचालक आणि iv) तज्ञ

# माहितीपत्रकातील चुकीच्या विधानाबद्दलचे दायित्त्व

## अ) दिवाणी दायित्त्व

उद्देशपत्रकाच्या प्रसिद्धीला मान्यता देणाऱ्या संचालकांची, प्रवर्तकांची किंवा इतर व्यक्तींची जी जबाबदारी असते त्याला दिवाणी स्वरूपाची जबाबदारी म्हणतात. या दाव्याबाबत पुढील व्यक्ती जबाबदार असू शकतात:

१) उद्देशपत्रक प्रसिद्ध करतेवेळी असलेला कंपनीचा प्रत्येक संचालक.

२) कंपनीच्या संचालकासाठी संमती दिलेला व उद्देशपत्रकात नाव असलेला प्रत्येक संचालक.

३) कंपनीचा प्रत्येक प्रवर्तक.

४) उद्देशपत्रकाच्या प्रसिद्धीला परवानगी देणाऱ्या व्यक्ती.

५) तज्ज्ञ व्यक्ती-ज्यांच्या विधानावर विश्वास ठेऊन भाग खरेदी केले अशी व्यक्ती.

## ब) फौजदारी दायित्व

कंपनी कायद्यातील कलम ६३ नुसार उद्देशपत्रकात असत्य विधाने करणे हा फौजदारी अपराध आहे. असत्य विधाने असणे अथवा खोटी विधाने जर जाणून बुजून दुसऱ्यांना फसविण्यासाठी आणि त्यांना भाग किंवा कर्जरोखे विकत घेण्यास प्रवृत्त उत्तेजित करणारी असतील तर उद्देशपत्रक प्रसिद्ध करण्यासाठी जबाबदार असलेली व्यक्ती २ वर्षे कैद किंवा ५,००० रुपये दंड अशा शिक्षेस पात्र ठरू शकते. गुंतवणूक करणाऱ्या व्यक्तीला कंपनीवर अशी कारवाई करण्यासाठी पुढील मुद्यांचे स्पष्टीकरण करावे लागेल:

१) संबंधित असत्य विधान कंपनीने किंवा त्याच्या वतीने करण्यात आले आहे आणि ते प्रमुख गोष्टीशी संबंधित आहे.

२) गुंतवणूक करणाऱ्या व्यक्तीने योग्य त्या अवधीत आणि कंपनीचे विसर्जन होण्यापूर्वी ती दूर करण्याचा प्रयत्न केला होता.

# माहितीपत्रकातील अवैधतेचा लोप

माहिती पत्रकातील अवैधतेचा लोप करण्यासाठीच्या उपाययोजना पुढीलप्रमाणे सांगता येतील.

## १) भाग खरेदी करारावरती बंधने आणणे

अशी कोणतीही व्यक्ती की जिने माहिती पत्रकातील विपर्यस्त विधानाच्या आधारे विश्वासाने भाग खरेदीचा करार केला तर ती व्यक्ती त्या करारावरती बंधने आणून त्याचे नाव नोंदीतून काढून टाकण्यासाठी त्याच्या नावे अर्ज दाखल करू शकते.

## २) मागणीवर केलेल्या कृतीसाठी चुकीचे वर्णन किंवा लबाडी केल्याचा प्रतिवाद

जर एखाद्या व्यक्तीने दिशाभूल केली म्हणून किंवा चुकीचे वर्णन (विपर्यास) केले म्हणून, मागणीप्रमाणे पैसे देण्यास नकार दिला आणि अशा मागणीवर पैसे दिले नाही म्हणून तीचे भाग जप्त झाले, तर सामान्य ऋणकोपेक्षा वेगळ्या आधारावर केस उभी रहाते आणि तो करार नाकारू शकतो आणि मागणीबाबत अशी कोणतीही कारवाई केली असेल तर लबाडी/फसवणूक केल्याच्या आधारावर बचाव किंवा प्रतिवाद करू शकतो.

## ३) सभासद नोंदणी वहीतील सुधारणा आणि आनुषंगिक साहाय्य

जर एखाद्या माहितीपत्रकात वस्तुस्थिती बाबत खोटे निवेदन करून एखाद्या व्यक्तीला त्यावर कृती करण्यास प्रवृत्त केले आणि अशा निवेदनानुसार वागतांना नुकसान झाले तर भाग दिले गेलेली व्यक्ती नोंदणी वहीतून त्याचे नाव काढून टाकण्यासाठी सांगू शकते.

## ४) लबाडीच्या कृतीमध्ये नुकसान भरपाई

भागधारक वस्तुस्थिती लपविण्याच्या कृतीविषयी कारवाई करू शकतो खोटे आणि दिशाभूल करणारे माहितीपत्रक देण्यास जबाबदार असणाऱ्या व्यक्ती विरूद्ध भरपाईसाठी कारवाई करू शकते.

## ६) फौजदारी कामकाज

कलम ६३, माहितीपत्रकात खोट्या निवेदनाबद्दल फौजदारी जबाबदारीची तरतूद करते आणि नमूद करते की, माहितीपत्रक अधिकृतपणे जारी करणारी प्रत्येक व्यक्ती दोन वर्षापर्यंत तुरूंगवासाच्या शिक्षेस पात्र असेल किंवा ५००० पर्यंत दंडास पात्र असेल किंवा या दोन्हीसाठी पात्र असेल.

## घटनापत्रक आणि नियमावलीतील फरक

| मुद्दे | घटनापत्रक | नियमावली |
|---|---|---|
| स्थान | घटनापत्रकाला प्राथमिक स्थान आहे. | नियमावलीला दुय्यम स्थान आहे. |
| महत्व | कंपनीच्या दृष्टीने घटनापत्रकाला विशेष महत्व आहे. | नियमावलीला घटना पत्रकाच्या तुलनेत कमी महत्व आहे. |
| बदल | घटनापत्रकामध्ये कधीही/कसाही बदल करता येत नाही. | नियमावलीच्या बदलांबाबत फारशी बंधने नाही. |
| अधिकारांचा उल्लेख | यामध्ये सर्व अधिकारांचा उल्लेख असतो. | घटना पत्रकातील अधिकारांचा उल्लेख कशा रीतीने याचा उल्लेख यामध्ये असतो. |
| व्याप्ती | घटनापत्रकामध्ये कार्याची व्याप्ती स्पष्ट केली जाते. | नियमावलीची व्याप्ती घटना पत्रकाच्या व्याप्तीवर अवलंबून असते. |
| कार्य | कंपनीला घटनापत्रकात समाविष्ट असलेल्या कृत्ये सोडून बाहेरील कृत्ये करता येत नाही. | यामध्ये तसा बदल करून कार्य करता येतात. |
| नोंदणीची सक्ती | घटनापत्रकाची नोंदणी सक्तीची आहे. | नियमावलीची नोंदणी सक्तीची नाही. |

---

**संदर्भ ग्रंथ -**


- कंपनी कायद्याचे घटक -I -डॉ. गोविंद डुंबरे ,डॉ. शिवाजी टाकळकर ,डॉ. आशा कदम-पेंढारी
- कंपनी कायद्याची मुलतत्वे – प्रा. सुरेश भिरूड आणि इतर
- कंपनी कायद्याची मुलतत्वे(भाग १) – डॉ. धीरज झाल्टे आणि इतर
- Elements of Company Law - Sultan Chand & Sons
- Elements of Company Law - N.D.Kapoor
- Elements Of Company Law- Prof.Prakash N. Chaudhary